ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – V February 2014

# महात्मा गांधीजींचे अहिंसा व सत्याग्रह या विषयीचे विचार

**प्रा. श्रीमती. आर. डी बरकले,**
**सहाय्यक प्राध्यापिका,**
**शिक्षणशास्त्र महाविदयालय, नाशिक.**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्य मिळविण्याच्या कार्यात अनेक क्रांतिकारक, नेते यांना प्राणाची आहूती दयावी लागली. त्याची आठवण स्वातंत्र्यदिन जवळ येताच प्रकर्षाने होते. या सर्वांना आदरांजली वाहावयाची असेल तर आपल्याला काही व्यक्तींची आठवण होते. त्यापैकी आजन्म अहिंसेने लढा देणारे आपले बापुजी महात्मा गांधीजी. त्यांचा सत्याचा लढा व अहिंसा हे तत्त्व.

**अहिंसा :**

अहिंसेने लढा देणारे व भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्न करतांना अहिंसा मर्गाचा अवलंब करणारे महात्मा गांधीजी होऊन गेले.

**हिंसेचे तीन प्रकार सांगता येतील.**

१. **शाब्दिक हिंसा :** बोलून एखादयाचे मन दुखविणे.
२. **मानसिक हिंसा :** मन दुखविण्याप्रमाणेच.
३. **शारीरिक हिंसा :** मारणे.

बौध्द धर्म, जैन धर्म या धर्मांनी सुध्द अहिंसेला महत्त्व दिले आहे. महात्मा गांधीजींच्या व्यक्तिगत व सार्व जनिक जीवनात सत्य व अहिंसा या तत्वांना महत्त्व आहे.

१. अहिंसा म्हणजे भेकडपणा नव्हे. महात्मा गांधींनी आपल्या अनुयायांना अन्यायाशी व जुलमांशी अहिंसात्मक प्रतिकार करावयास शिकविले. पण ही अहिंसा भ्याड माणसांची नव्हती. जो निर्भय असतो. शूर असतो त्यासच ही अहिंसा आचरता येते. महात्मा गांधीजी म्हणतात, " अहिंसा हा भ्याडाचा किंवा नेभळटपणाचा मार्ग नव्हे, मृत्युला सामोरे जाणाऱ्या शुरांचा तो मार्ग आहे. हाती शस्त्रे घेऊन जो मृत्युमुखी पडतो तो निःसंशय शूर आहे. परंतु जरा देखील कच न खाता किंवा बोटे देखील न उचलता मृत्युला सामोरा जातो तो अधिक शूर म्हटला पाहिजे. "

युध्दाने हिंदूस्थानच काय, अखिल जगाचाही उध्दार होऊ शकणार नाही अशी महात्मा गांधींची दृढ श्रध्दा होती ते म्हणतात, " शस्त्रास्त्रांच्या खणखणाटाने भारताचा तर नाहीच पण जगाचा देखील उध्दार होणे कठीण आहे."

असे असले तरी अहिंसेवरील आपले विचार म्हणजे अखेरचे भाष्य होऊ शकत नाही, असे ते नम्रपणे सांगतात. माझा विचार म्हणजे अखेरचे भाष्य समजू नका. मला स्वतःच्या मर्यादांची जाणीव आहे. सत्याचा शोध करणारा मी एक नम्र पाईक आहे. माझ्या प्रत्येक प्रयोगामुळे अहिंसेवरील माझी श्रध्दा अधिक दृढमूल झाली आहे. अहिंसा ही मानवजातीला उपयुक्त अशी एक सर्वश्रेष्ठ शक्ती आहे. तिचा उपयोग व्यक्तीपुरताच मर्यादित नाही. तिचा प्रयोग समुदायालादेखील करता येईल, अशी माझी दृढ श्रध्दा आहे.

**सविनय कायदेभंग म्हणजे अहिंसात्मक बंड :**

व्यक्ती अथवा समाज दडपशाहीच्या कायदयाचा आत्मबलाने व अहिंसेवर श्रध्दा ठेवून कायदेभंग करतो. तेव्हा ते एक प्रकारचे बंडच असते. तो एक अहिंसात्मक सविनय प्रतिकार असतो. महात्मा गांधी म्हणतात, " संपूर्ण सविनय कायदेभंग म्हणजे हिंसेचा किंचितदेखील अंश नसणारे एक बंड. सर्वतोपरी परिपुर्ण सविनय प्रतिकारक सरकारच्या अधिकाराची पर्वा करीत नाही. सरकारच्या प्रत्येक अन्यायी कायदा धुडकावून लावण्याची घोषणा करणारा तो बंडखोर बनतो. उदा. तो कर देण्याचे नाकारील. आपल्या दैनंदिन व्यवहारात तो सरकारी कायदयाच्या अधिकारांना जुमानण्याचे नाकारील. तो बेकायदा प्रवेशाचे नियम धुडकावून लावील.... हे सगळे करतांना तो शरीरसामर्थ्याचा उपयोग करीत नसतो किंवा त्याच्याविरुध्द वापरण्यात येणाऱ्या साामर्थ्यांचा प्रतिकार करत नसतो.

**सत्याग्रहाचे मूलभूत नियम :**

महात्मा गांधीजींनी सत्याग्रहाचे मूलभूत नियम पुढीलप्रमाणे प्रतिपादित केले आहेत.

१. ज्यांना अन्याय सोसावा लागतो त्यांनीच सत्याग्रह करावा हे सत्याग्रहाचे सारभूत तत्त्व.
२. अन्याय कारणाकरिता सत्याग्रह होऊच शकत नाही.
३. सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ सत्याविषयीचा आग्रह असा आहे या आग्रहामुळे साधकाच्या हाती अनुपम शक्ती येते. सत्याग्रहाने एकदा आपली कमीत कमी मागणी ठरवून टाकल्यानंतर त्यापासून माघार घेऊ नये.
४. विरोधकांच्या बाबतीत सौजन्य व त्यांचा दृष्टिबिंदू (दृष्टिकोन) समजून घेण्याविषयी आतुरता हा सत्याग्रहाचा श्रीगणेशा आहे.
५. विरोधकामध्ये जे काही सर्वेत्कृष्ट असेल ते शोधून काढून त्याला आढविणे यात साधुत्व आहे.
६. सत्याग्रह अगोदर सुचना न देता एकदम आणि इतर सौम्य स्वरुपाचे उपाय अजमावल्यापासून कधीही सुरु करता येत नसतो.
७. आत्मक्लेषाने मनात पालट घडवून आणणे हा सत्याग्रहाचा उद्‌देश असतो. अत्यंत कठोर हृदयाचा किंवा अत्यंत स्वार्थी प्रतिपक्षी असला तरी त्याच्या मनात पालट घडवून आणण्याच्या कामी जी जी संधी मिळेल ती स्वागतार्ह मानली पाहिजे.

८. सत्याग्रही हा आपल्या मनात क्रोधाला थारा देणारा नाही. प्रतिपक्षाचा राग तो सहन करील. प्रतिपक्षाकडून होणारे आघात तो सहन करील उलट आघात करणार नाही.

९. सत्याग्रह खरा असेल तर प्रतिपक्षाची त्याच्याविषयीची वृत्ती त्यांच्या अहिंसेमुळे मृदु व्हावी कडक होवू नये, त्या अहिंसेने तो विरघळून जावा.

१०. अन्याय करणाऱ्याला पेचात पाडणे हा सत्याग्रहाचा कधीही उद्‌देश नसतो.

११. प्रतिपक्षाकडून जितकी दडपशाही आणि अन्याय जास्त होईल तितके अधिक आत्मक्लेश, अन्यायाला बळी पडत असलेल्यांनी आपल्यावर ओढवून घ्यायचे असतात.

१२. आमरणान्त उपवास हा सत्याग्रहाच्या कार्यक्रमाचा एक अविभाज्य भाग आहे.